**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : प्रतिनि-२०२०/प्र.क्र.५३/झोपनी-२
गृहनिर्माण विभाग,३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०००३२.
दिनांक :- ५ /१०/२०२०

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना)
महसुल/ वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई

**विषय :-** गृहनिर्माण विभागाच्या अधिपत्याखालील अतिक्रमण / निष्कासन या कार्यालयातील गट-अ व गट-ब मधील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत....

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दिनांक १७/१२/२०१६
२) गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.प्रतिनि-२०१९/प्र.क्र.१२८/झोपनि-२, दि.१८/०२/२०२०.

महोदय/महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदावंर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिपत्याखालील अतिक्रमण / निष्कासन या कार्यालयातील पदे ही प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत दि. १८/०२/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयांतील तरतूदीनुसार विभागाच्या अधिपत्याखालील अतिक्रमण / निष्कासन या कार्यालयातील खालील तक्त्यात नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत :-

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | पद संख्या | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|---|
| **अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अखत्यारितील अतिक्रमण/ निष्कासन कार्यालयातील पदे** | | | | | |
| १ | तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, धारावी याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | S-२० : ५४१००-१७७५०० | तहसिलदार |

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | पद संख्या | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|---|
| २ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, धारावी याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-१४ :** ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ३ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, कुलाबा याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-१४ :** ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| **अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे, मुंबई यांच्या अखत्यारितील अतिक्रमण/ निष्कासन कार्यालयातील पदे** | | | | | |
| १ | निवासी उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-२३ :** ६७७००-२०८७०० | उपजिल्हाधिकारी |
| २ | सक्षम प्राधिकारी (उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन), कुर्ला-२ | कुर्ला | १ | **S-२३ :** ६७७००-२०८७०० | उपजिल्हाधिकारी |
| ३ | सक्षम प्राधिकारी (उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन), बांद्रा-१ | बांद्रा | १ | **S-२३ :** ६७७००-२०८७०० | उपजिल्हाधिकारी |
| ४ | लेखाधिकारी, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-१६ :** ४४९००-१४२४०० | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा |
| ५ | सहायक नियंत्रक, गलिच्छ वस्त्या, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-१५ :** ४१८००-१३२३०० | तहसिलदार |
| ६ | नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे याचे कार्यालय, मुंबई | मुंबई | १ | **S-१४ :** ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | पद संख्या | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|---|
| ७ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, कुर्ला-१ याचे कार्यालय, कुर्ला | कुर्ला | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ८ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/निष्कासन, घाटकोपर याचे कार्यालय, घाटकोपर | घाटकोपर | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ९ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, चेंबूर याचे कार्यालय, चेंबूर | चेंबूर | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| **अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का),पश्चिम उपनगरे, मुंबई यांच्या अखत्यारितील अतिक्रमण/ निष्कासन कार्यालयातील पदे** | | | | | |
| १ | सहायक लेखाधिकारी, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पश्चिम उपनगरे याचे कार्यालय, बांद्रा | बांद्रा | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा |
| २ | नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पश्चिम उपनगरे याचे कार्यालय, बांद्रा | बांद्रा | ३ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ३ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, बांद्रा-१ याचे कार्यालय, बांद्रा | बांद्रा | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ४ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, मालाड याचे कार्यालय, मालाड | मालाड | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |
| ५ | नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/ निष्कासन, अंधेरी याचे कार्यालय, अंधेरी | अंधेरी | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | नायब तहसिलदार |

२. तरी आपणास विनंती करण्यात येते की, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिका-यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ.माहिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे दि.२०.१०.२०२० पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिका-याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की,सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

आपला विश्वासू

(श्रीनिवास मोकलीकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (महसुल) यांचे स्वीय सहाय्यक, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (वित्त यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहाय्यक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई
५) अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पुर्व उपनगरे याचे कार्यालय, इंडस्ट्रियल अश्युरन्स बिल्डींग, पहिला मजला, चर्चगेट स्टेशनसमोर, चर्चगेट, मुंबई.
६) अपर जिल्हाधिकारी (अति/ निष्का), पश्चिम उपनगरे याचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रे (पु), बांद्रा, मुंबई
७)निवडनस्ती/झोपनि-२, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

## गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारितील अतिक्रमण व निष्कासन कार्यालयातील उपजिल्हाधिकारी/तहसिलदार/नायब तहसिलदार ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २. | पदनाम/ संवर्ग<br>सध्याच्या पदाची वेतनश्रेणी | |
| ३. | सध्याच्या कार्यालयाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | जन्म दिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७. | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद | |
| ८. | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९. | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १०. | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे- | |
| ११. | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १२. | शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.१२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे | |